# ४) णाअसीलो मेहरो

'मणोरमाकहा' हा धर्मोपदेश-कथांचा संग्रह ग्रंथ आहे. हा ग्रंथ श्रीवर्धमानसूरींनी गुजरातमधील धंधुका या गावामध्ये इ.स. ११३८ मध्ये लिहिला. या ग्रंथामध्ये मनोरमेच्या चार जन्मांचे (भवांचे) वर्णन केले आहे. हे चार भवांचे वर्णन चार अध्यायांमध्ये (अवसरांमध्ये) केले आहे. यामध्ये एकूण ८० कथा आल्या आहेत.

प्रस्तुत उतारा धनगुप्ताच्या चार मुलांबद्दलचा आहे. या उताऱ्यामध्ये धनगुप्ताच्या मृत्यूनंतर त्याच्या चार मुलांमध्ये मालमत्तेवरून भांडणे होऊ लागली. ही भांडणे एक अशिक्षित गवळी आपल्या बुद्धिचातुर्याने कसे मिटवतो ? ही हकीकत आपल्याला प्रस्तुत उताऱ्यातून दिसते.

अत्थि वंग-विसय-सारा मुत्तिवई णाम णअरी। तीए णअरीए लोग-ववहार-कुसलो पच्छिम-वए वट्टमाणो धण-धणदत्त-धणमित्त-धणचंदाभिहाणाणं चउण्हं पुत्ताणं पिआ धणगुत्तो सेट्ठी। सो जरा-जज्जरिअ-काओ, सूलाइ-तिव्व-रोगाभिभूओ पाण-संसए वट्टइ। मिलिआ सुहि-सयणा। भणिओ तेहिं सेट्ठी- 'धरमाणो चेव तहा करेहि जहा पुत्ताणं पच्छा विरोहो ण हवइ'। तेण भणिअं- 'तुम्ह साहेज्जेण एअं सिज्झइ'। तेहिं भणियं- 'सहाया वयमेत्थ पओयणे'। सेट्ठिणा भणिअं- 'जइ तो, संति अणेण चउसु वि कोणेसु मंदिरस्स चत्तारि कलसा। किज्जंतु पत्तेयं धणाइ-णामंकिआ। जस्स जत्थ णामयं सो चेव तेण लेअव्वो विसंवाए भवंतो सक्खिआ'। तहेव कअं। गआ सट्ठाणं सयणाइया।




अण्णया उवरओ सेट्ठी। कइवय-दिणेहिं कय-मय-किच्चा, विगय-सोगा, घर-कज्जाणि विचिंतिउमाढत्ता तणया। वच्चंति वासरा। कलहंति परोप्परं तेसिं जायाओ। तण्णिमित्तं ताण वि जायइ चित्त-खंडणा। अण्णम्मि दिणे भणिआ धणेण धणदत्ताइया- 'संपयं जइ पुढो हविज्जइ तो सोहणं'।

पडिवण्णं सव्वेहिं। सोहण-दिणे सुहि-सयण-समक्खं उक्खणिओ धणेण णिअ-णामंकिय-कलसो, जाव तत्थ धूली चेव केवलं। ठिओ अहो-मुहो लज्जाए। धणदत्तेण वि उक्खणिओ णिय-कलसो। तस्स पुण अट्ठीणि चेव केवलाणि। सो वि विलक्ख-वयणो सयण-जण-मुहाणि जोइउमाढत्तो। धणमित्तेण वि उक्खणिओ णिअ-कलसो। तत्थ वि वहियाओ चेव केवलाओ। सो वि संजाअ-विलक्खो ठिओ अहो-मुहो। धणचंदेण वि कड्ढिओ णियकलसो। सो पुण रुप्प-सुवण्ण-मणि-मोत्तिएहिं पडिपुण्णो दिट्ठो।

हरिसिअ-हिअओ, विअसिय-वअण-णअणो, कलसं गहाय गच्छंतो भणिओ धणचंदो धणाईहिं- 'वच्छ! कहिं गम्मइ ? मुंच कलसं। सअल-साहारणो एस अत्थो। समभागेहिं कीरउ। किं ण अम्हे ताय-तणआ ?' सो कहेइ- 'ताएण जं दिण्णं तं गिण्हह'। एवं तेसिं विसम-वयंताण जाअं भंडणं। णिवारिआ सुहि-सयण-वग्गेण धणाइणो- 'ण एत्थ तुब्भेहिं किं पि लहेयव्वं जीवंतेण वि सेट्ठिणा छिण्णो तुब्भाण ववहारो'।


परिभूयं अत्ताणं मण्णमाणा ते पंचउलमुवट्ठिआ। तेण वि विण्णाय-वुत्तंतेण णिवारिया। अमच्च-सामंत-रण्णा

वि 'जुत्तमेअं' ति णिवारिआ। 'ण एत्थ छिण्णो ववहारो' त्ति भणिऊण संचलिआ चउरो वि वसंतपुराभिमुहं। मग्गे समासण्ण-गोउले सव्वे ठिआ। दिट्ठो मेहरो णाम गोउलाहिवई। तेण पुच्छिआ, 'के तुब्भे? किं णिमित्तं वा इहागआ?' कहिओ तेहिं सव्वो वइयरो।

साहाविअ-मइ-विहवेण मेहरेण जंपिअं- 'ण तुम्हाण पिउणो एगस्स वि परिभवो कओ। णवरं जो जत्थ कुसलो, सो तस्स सामिओ समाइट्ठो। पढमो खेत्त-घर-हट्टाण। बीओ गवाइ-चउप्पयाण। तइओ कलंतराइ-दिण्ण-दविणस्स। चउत्थो 'बालो' त्ति काऊण रुप्प-सुवण्णाईण सामी कओ'।

संजाय-पच्चएण भणियं धणेण- 'घडइ ते वयणं। जओ कुसलो अहं घराइ-कज्जेसु'। बीएण भणिअं- 'अहं पुण चउप्पय-विसएसु'। तइएण भणियं- 'अहं उग्गाहणियाए'। 'अओ चेव ताएण एवंविहा कलसा कय' त्ति हरिसिय-मणसा समागया स-णअरं। समीव-संठिएण सुओ एस वइयरो पुरिसेण। कहियं रण्णो। बीय-दिणे सद्दाविओ मेहरो।

संभंत-चित्तो समागओ गहिऊण दहि-दुद्धाइ-पाहुडं। पणमिऊण णराहिवं णिविट्ठो। पुच्छिओ राइणा- 'कहिं तए एरिसो विवाअ-परिच्छेओ सिक्खिओ?' तेण भणिअं- 'महाराअ! रण्णे जायाणं, रण्णे चेव संवड्ढियाणं, कत्तो




सिक्खागमो अम्हारिस-पुरिसाण? साहाविआ मे मई।' सम्माणिऊण वत्थाईहि विसज्जिओ मेहरो।



## सद्दत्था

**वंगविसयसारा** – वंग प्रांतातील प्रमुख (नगरी)
**मुत्तिवई** – नगरीचे नाव
**पच्छिमवए** – उतारवयात, म्हातारपणी
**सूलाइ** – शूल इत्यादी. शूल हे रोगाचे नाव, पोटशूळ इत्यादी
**पाणसंसए** – आसन्न मरण अवस्थेत
**सुहिसयणा** – जवळचे स्वत:चे लोक / नातेवाईक (मित्र इत्यादी)
**किज्जंतु** – केला जावा
**लेअव्वो** – घ्यावा
**सक्खिआ** – साक्षीदार
**उवरओ** – निधन पावला
**कय-मय-किच्चा** – मृत्यूचे संस्कार (अंत्य-संस्कार) केलेले (ते)
**विगयसोगा** – शोक / दु:ख दूर झाले आहे असे ते
**जायाओ** – पत्नी (बहुवचनी शब्द)
**संपयं जइ पुढो हविज्जइ तो सोहणं** – आता आपण वेगळे झाल्यास उत्तम होईल.
**पुढो** – वेगळे
**पडिवण्णं सव्वेहिं** – सर्वांनी त्याचा स्वीकार केला.
**उक्खणिओ** – खणले
**अट्ठीणि** – अस्थि, हाडे
**विलक्खो** – लज्जित
**जोइउमाढत्तो** – (जोइउं + आढत्तो) पाहण्यास सुरुवात केली.
**वहियाओ (दे.)** – हिशोब लिहिण्याच्या वह्या
**साहारणो** – साधारण
**परिभूयं** – अपमानित
**मण्णमाणा** – मानणारे
**विण्णायवुत्तंतेण** – वृत्तांत/हकीकत जाणल्याने/जाणून घेतल्याने
**ववहारो** – तंटा, कलह, भांडण
**समासण्ण** – जवळच्या असलेल्या
**गोउलाहिवई** – गवळी-वाड्याचा प्रमुख
**वइयरो** – प्रसंग
**साहाविअमइविहवेण**– नैसर्गिक/उपजत बुद्धीच्या वैभवाने, अत्यंत हुशारीने
**परिभवो** – अपमान
**णवरं (अव्यय)**– केवळ
**हट्ट** – बाजार, दुकान
**गवाइचउप्पयाण** – गाय इ. चतुष्पाद प्राण्यांचा
**कलंतराइ** – व्याज इत्यादी
**दविणस्स** – संपत्ती, पैसे यांचा
**संजाय-पच्चएण** – योग्य काय आहे ते कळल्यामुळे
**उग्गाहणियाए** – वसुली, तगादा यांमध्ये
**पाहुडं** – भेट, उपहार

## सज्झाओ

### १) माध्यम भाषेत भाषांतर करा.

१) अत्थि वंग-विसय-सारा ..... वयमेत्थ पओयणे'।

२) सोहण-दिणे ...... ठिओ अहो-मुहो।

३) परिभूयं अत्ताणं ...... वइयरो ।

४) संभंत-चित्तो ...... विसज्जिओ मेहरो।

५) हरिसिय-हियओ ...... तुब्भाण ववहारो'।

### २) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) 'मुत्तिवई' नगरीतील व्यवहारकुशल श्रेष्ठीचे नाव सांगा.

२) श्रेष्ठीने आपल्या मुलांच्या नावाचे कलश तयार करण्याचे कारण सांगा.

### ३) संदर्भासह स्पष्टीकरण करा.

१) 'ताएण जं दिण्णं तं गिण्हह।'

२) 'तुम्ह साहेज्जेण एअं सिज्झइ।'

३) 'घडइ ते वयणं। जओ कुसलो अहं घराइ-कज्जेसु'

**४) समास ओळखा.**

१) ववहारकुसलो –
२) पंचउलं –
३) गोउलाहिवई –

**५) जोड्या लावा.**

| अ गट | ब गट |
|---|---|
| १) पिआ | अ) गोउलाहिवई |
| २) धणं | ब) अट्ठिकलसो |
| ३) मेहरो | क) रुप्प-सुवण्ण-कलसो |
| ४) धणदत्तो | ड) पढमो पुत्तो |
| ५) धणचंदो | इ) धणगुत्तो |


**६) मराठी प्रतिशब्द द्या.**

१) रुप्प – .....
२) ववहार – .....
३) सेट्ठी – .....
४) कलस – .....
५) वहिया – .....
६) दविण – .....

**७) खालील शब्दांतून तीन अर्थपूर्ण वाक्ये तयार करा.**

पिआ, गंतुं, ण्हाणं, पुप्फाइं, गिण्हिऊण, देवयापूयाणं, मालाओ, करेइ, सो, सा, आवणे(हट्टे), घराओ, य, णिग्गओ, गुंफेइ।

**८) धनगुप्ताच्या मुलांची नावे लिहून रेखाजाल पूर्ण करा.**




**९) या धड्यातील उपसर्गासहित शब्द शोधून उपसर्ग व धातू वेगळे करून लिहा.**

**१०) रूपे द्या.**

१) विलक्ख – पुलिंगी षष्ठी बहुवचन
२) उवरम – कर्मणि भूतकालवाचक धातुसाधित विशेषण, स्त्रीलिंगी तृतीया एकवचन –
३) भण – वर्तमानकाळ द्वितीय पुरुष बहुवचन –
४) लह – विध्यर्थक विशेषण –
५) कर – भविष्यकाळ तृतीय पुरुष एकवचन –
६) दिण – सप्तमी एकवचन –
७) मंदिर – षष्ठी एकवचन –
८) लज्जा – सप्तमी बहुवचन –
९) मोत्तिय – तृतीया बहुवचन –

**११) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) जह, तहा, जहा, वयण
२) वयणं, णयणं, कमलं, सीया
३) भट्टो, हरिसिओ, लज्जिओ, हसित्था
४) कमला, णेहा, भाणुमई, धणदत्तो